**सं.फौ.ख.क्र. ३२०/२०२२**
**निशाणी क्र. ९**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** उत्तम सिद्राम मोहिते,

**वयः** ७८ वर्षे, **व्यवसायः** काही नाही,

**पत्ताः** मौजे जंक्शन, ता इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील ॲड श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

मला घटनेची तारीख आठवत नाही. मी वालचंदनगर पोलिस स्टेशन येथे सही केली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर मला माहित नाही. त्यावर माझी साक्षीदार क्र. १ म्हणून सही आहे. सहीस **निशाणी क्र. १०** देण्यात येते. असे काही घडले नव्हते की, दिनांक ०७/०२/२०२० रोजी मी वालचंदनगर पोलिसांसमवेत काझड गावच्या हद्दीत दुसरा पंच लोंढे यांच्यासमवेत आरोपीच्या घराच्या आडोश्यास छापा टाकण्याकरिता गेलो असता त्यावेळेस तेथे आरोपी अवैध्यरित्या दारू विक्री करत असताना आढळून आला.

(सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी मदत करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. विनंतीवरून भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे परवानगी देण्यात येते.)

**उलटतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, छाप्यामध्ये आरोपीकडे देशीदारूच्या मस्तांनी सत्रा नावाच्या १४ बाटल्या असा एकूण ७२८/— रूपयाच्या बाटल्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालापैकी रासायनिक पृथक्करणाकरिता १८० मिली क्षमतेची बाटली काढून ठेवली. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुददेमालाच्या पंचनाम्यावर माझी आणि दुसरे पंच याची सही घेतली आणि जप्ती पंचनामा करण्यात आला. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि मी एकाच परिसरातील असल्यामुळे आरोपीला वाचविण्याकरिता आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**सं.फौ.ख.क्र. ३२०/२०२२**
**निशाणी क्र. ९**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. सी.शिंदे यांचे मार्फत शपथेवर</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरित/—

(जे. बी. खटावकर)

दिनांक १२/१२/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापुर.